

# चिंतनापूर्वी

सहज चिंतनातील हे स्फुरण विधायक विचाराने पोषक ठरेल. चित्त शुद्धीसाठी उपयोगी ठरेल. अंतर्मुखतेला मदत करेल. तसेच देवभाव जागृतीस उपयोगी ठरेल. म्हणून सद्गुरु श्री गुरुनाथ विश्वनाथ मुंगळे यांचे विचार एकत्रित करुन अवलोकनासाठी तसेच चिंतनासाठी छापावेत असे वाटले. त्यास सद्गुरुंनी अनुमती दिली त्याबद्दल आनंद वाटतो. या आनंदाचे स्वानंदात रुपांतर व्हावे म्हणून हा प्रयत्न. आणखी अशीच अनेक पुस्तके होणार आहेत. अक्षय निदान असलेला परमात्मा विविध अक्षरातून कसा नटतो ते ती अक्षरे वाचल्यावरच कळते.

सर्वांचा शुभचिंतक

**श्री. गोविंद चांडक**

॥ श्री ॥

१) कृपा :- मी असमर्थ आहे ही जाणीव नाहीशी होणे. जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात मी अपूर्ण नाही ही जाणीव म्हणजे कृपा होय. साधक भगवंतमय होऊन जातो, बाहेरच्या संघर्षाला भीत नाही. आंतरिक संघर्ष मावळतो पण हे दोन्ही संघर्ष मावळण्यासाठी भक्त व्हावे लागते.

२) भक्त :- जो विभक्त असत नाही तो भक्त. जो उपास्य दैवताशिवाय वेगळा नाही, त्याच्याशिवाय विचार करू शकत नाही, श्वासोच्छ्वास करू शकत नाही तो भक्त. ज्याठिकाणी स्वाभाविक विरक्ती सिध्द झाली तो भक्त.

३) अभिषेक :- ज्यावेळी परमात्मशक्तीचा विचार दृढ

होतो, देहभावाच्या पलीकडे जातो, देवभाव दृढ होतो, शरीरातील सहा चक्रे ईश्वरभावनेने भरून जातात, ब्रह्मरंध्राचा प्रवास होऊन सहस्त्रदलापर्यंत तो स्थिर होतो, तेव्हा शरीरात भक्तिरस पाझरू लागतो तो अभिषेक होय.

४) गुरू :- ज्याच्या ठिकाणी जीवाचे सर्व लघुत्व संपून जाते व ज्याचा आत्मप्रत्यय सर्वव्यापी आहे तो गुरू.

५) ज्या ठिकाणी प्रेम संपन्न होतं त्या ठिकाणी सद्भाव वाढतो. इतका वाढतो की तो शब्दात सांगता येत नाही आणि शब्दाविना संवादाचा रस्ता अध्यात्मात आहे.

६) एकांत :- देहभावाशी निगडित झालेल्या मी चा जेव्हा अंत होतो, चित्तशुद्धी झाल्यावर खोट्या 'मी' चा अंत व खऱ्या मी चा जन्म होतो तोच एकांत होय.

आंतरिक निष्ठा संपन्न होण्यासाठी एकांत आवश्यक आहे. सद्गुरूंना जाणण्यासाठी बुध्दी, मन यांचा उपयोग नाही, तेथे आंतरिक निष्ठाच पाहिजे.

७) महाराज :- ज्या राज्यात अनेक राज्यं सामावून जातात तो महाराज तो आत्मविद् व आत्मस्थित असतो.

८) चैतन्य हे प्रवाही असते. ते जेव्हा सघन होते तेव्हा ब्रह्म बनतं म्हणून ब्रह्मचैतन्य.

९) परमहंस :- हंस असा लिलया संचार करतो की, जिथं तो संचार करतो तिथली कुठलीही बाधा त्याला होत नाही. संसारात राहूनही ब्राह्मी स्थितीत राहणारा तो परमहंस.

१०) साधू :- सहा विकार ज्या ठिकाणी अधू होतात तो साधू. साधू हा देह नाही ती एक वृत्ती आहे,